चुकीचे अर्थविवरण करुन कार्यकारी अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत मंजूर केलेला तिसरा लाभ रद्द करणेबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः उन्याप्र- २०१९ /प्र.क्र. २७/२०१९ /सेवा- ३
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : २१ ऑगष्ट,२०१९.

वाचा

शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक १ एप्रिल, २०१०
शासन परिपत्रक क्रमांक : आप्रयो-१०१६/प्र.क्र.५८/२०१६/सेवा-३, दि.१३ जून, २०१६

परिपत्रक -

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीसाठी गठीत केलेल्या मा. हकीम यांच्या अध्यक्षतेखालील वेतन सुधारणा समितीने ज्या पदांना विशिष्ट सेवा कालावधी नंतर समय वेतन श्रेणी / वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी / अकार्यात्मक वेतन श्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे, अशी वेतन श्रेणी हि सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी लाभ देण्यासाठी "पदोन्नती" समजण्यात येईल अशी शिफारस केली होती.

२. मा. हकीम कमीटीने केलेली शिफारस राज्य मंत्री मंडळाने स्विकृत केल्यामुळे त्या अनुषंगाने उचित शासन निर्णय वित्त विभागाने दि. १/४/२०१० रोजी निर्गमीत केला. या शासननिर्णयातील परिच्छेद क्र. २ (ब) (३) मधील तरतूदी नुसार विविक्षित सेवा कालावधी नंतर संबंधित पदाच्या कर्तव्य व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non Functional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला / येणारा लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल अशी तरतूद विहित करण्यात आलेली आहे. उदा- मंत्रालय / विधान मंडळ सचिवालयातील कक्ष अधिकाऱ्याना ४ वर्षाच्या नियमीत सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतन संरचना.

३. असे निदर्शनास आले आहे की, दिनांक १/१०/२००६ पासून लागू केलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे स्वरुप व तरतूदी स्पष्ट असताना सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व ग्रामविकास विभागातील कनिष्ठ अभियंता पदावरील कर्मचाऱ्यास शाखा अभियंता पदी दर्जोन्नती दिल्यांनतर त्या पुढे उप अभियंता / उप विभागीय अधिकारी पदाच्या वेतन श्रेणीत पहिला लाभ व त्या नंतर कार्यकारी अभियंता पदाच्या वेतन संरचनेतील दुसरा लाभ मंजूर करण्यात येत होता. या संदर्भात उपरोक्त विभागाकडून कनिष्ठ अभियंतांना शाखा अभियंता पदी देण्यात येणारी दर्जोन्नती

हा शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १/४/२०१० मधील तरतूदी नुसार पहिला लाभ व त्यानंतर उप अभियंता पदी मंजूर होणारा अकार्यात्मक वेतन संरचनेचा लाभ हा दुसरा लाभ अनुज्ञेय ठरणार असल्याचे, या विभागामार्फत वर नमूद केलेल्या विभागांना त्या त्या विभागाच्या नस्तीवर कळविण्यात आले होते.

४. अशाप्रकारे शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक १.४.२०१० मध्ये विहित केलेल्या तरतुदीनूसार तिसरा लाभ अनुज्ञेय नसताना ज्यां अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत तिसरा लाभ देण्यात आला आहे तो तिसरा लाभ तात्काळ बंद करावा व ही प्रथा तात्काळ बंद करावी. संबंधित अभियंत्यांना अनुज्ञेय नसलेला तिसरा लाभ रद्द करुन सर्व संबंधित अभियंता यांच्या वेतनाची पुनर्निश्चिती करण्यात यावी. वेतनपुनर्निश्चिती अंती जे कार्यकारी अभियंता या परिपत्रकाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सेवानिवृत्त होत नसतील, अशा कार्यकारी अभियंत्यांकडून अतिप्रदानाची तात्काळ वसूली करण्यात यावी, अशा आशयाचे परिपत्रक, वित्त विभागाने उपरोक्त तीनही विभागांच्या संबंधित अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन दि.१३.०६.२०१६ रोजी निर्गमित केले होते.

५. कनिष्ठ अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य व इतर यांनी सदर दि.१३.०६.२०१६ च्या परिपत्रकास मूळ अर्ज क्रमांक ८३७/२०१६ अन्वये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई मध्ये आव्हान दिले होते. सदर मूळ अर्जामध्ये मा. न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.०२.०२.२०१७ च्य अंतिम आदेशावरुन, उपरोक्त शासन परिपत्रक वित्त विभाग दि.१३.०६.२०१६ अन्वये वित्त विभागाने निर्गमित केलेले स्पष्टीकरण, योग्य असल्याचा निष्कर्ष काढून, सदर मूळ अर्ज फेटाळून लावला. मा. न्यायाधिकरणाच्या उपरोक्त दि.०२.०२.२०१७ च्या मा. न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध कनिष्ठ अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई मध्ये याचिका क्रमांक २६०५/२०१७ दाखल केली होती. या याचिकेत दि.०६.०२.२०१९ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत मा. उच्च न्यायालयाने मा. न्यायाधिकरणाचे दि.०२.०२.२०१७ चे अंतिम आदेश रद्द करुन ज्या अर्जदारांकडून दि.१३.०६.२०१६ च्या परिपत्रकाच्या परिणामी वसुली करण्यात आली आहे, अशी वसूल केलेली रक्कम संबंधितांना परत करण्याचे, प्रतिवादींना आदेशित केले.

६. शासन परिपत्रक विधि व न्याय विभाग दि.०२.०४.२०१४ मधील सूचना विचारात घेता, मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६.०२.२०१९ च्या आदेशाविरुद्ध जलसंपदा विभागाकडून मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करणे प्रस्तावीत असलेल्या विशेष अनुमती याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून शासन

परिपत्रक वित्त विभाग दि.१३.०६.२०१६ हे, या शासन परिपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहे. हे परिपत्रक रद्द केल्याच्या परिणामी मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६.०२.२०१९ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक ४४ मधील निर्देशाचे; जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामविकास विभाग या विभागांनी अनुपालन करावे. तसेच जलसंपदा विभागाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याची त्वरीत कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल वित्त विभागास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०८२११२५६४२८८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.08.21 13:15:17 +05'30'

(भा.ज.गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
७. सचिव, मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
९. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
११. *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१३. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१४. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१५. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१६. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
१७. आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१८. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
१९. सर्व विभागीय आयुक्त,
२०. सर्व जिल्हाधिकारी,
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
२३. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२५. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२७. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
३१. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
३२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३४. लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे/ औरंगाबाद
३५. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
३६. *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
३७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३८. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
३९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४

४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३

४२. इंडियन नॅशनल कॉँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५

४३. नॅशनलिस्ट कॉँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१

४४. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८

४५. वित्त विभागातील सर्व कार्यासने,

४६. निवड नस्ती, कार्यासन सेवा-३.

*पत्राद्वारे.